# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

**दि.२१/११/२०२३**

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

मिरा-भाईंदर शहरात सर्व नागरीकांनी दिवाळी हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला आहे. मा. आयुक्त श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रणाखाली विभागातील मेस्त्री व अभियंते शहरामध्ये पाणी पुरवठा व देखभालीचे काम करीत असून दिवाळीच्या कालावधीत शहरातील वितरण व्यवस्था व्यवस्थित राखली गेलेली आहे. सदर कालावधीत सर्व अभियंते व त्या अधिनिस्त कर्मचारी यांनी उपस्थित राहून योग्य प्रकारे उपलब्ध पाण्याचे नियोजन करून शहरातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवलेला आहे. सद्यस्थितीत शहरातील पाणी पुरवठा सुरळीत सुरू असून शहरामध्ये योग्य प्रमाणात व योग्य दाबाने पाणी पुरवठा होत आहे. परिणामी नागरीकांमध्ये पाणी पुरवठ्याबाबत समाधानाचे वातावरण आहे.

सदर कालावधीमध्ये नागरीकांनी पाण्याचे जीवनातील महत्व जाणून पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य केले याबद्दल मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरातील सर्व नागरीकांचे आभार मानन्यात येत आहे.